| CNR No.MHPU130016142022 | नियमीत दिवाणी दावा क्र.३५१/२०२२<br>प्रशांत<br>वि.<br>संजय |
|---|---|

## निशाणी क्र. ३८ वरील आदेश

(दि. १०.०२.२०२६ रोजी पारित )

१. प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दि.प्र.सं.चे आदेश ६ नियम १७ प्रमाणे दाव्यामध्ये नवीन कलम समाविष्ट करण्यास व त्याप्रमाणे दावा दुरुस्तीस परवानगी मिळणेबाबत दाखल केला आहे.

२. वादी यांचे असे कथन आहे की, वादी यांनी प्रस्तुत दावा निरंतरचे ताकीदीसाठी प्रतिवादी यांचे विरुद्ध दाखल केलेला आहे. वादी यांनी दिलेल्या अर्जावरून न्यायालयाने मा. उपअधीक्षक भूमी अभिलेख, पुरंदर यांना कोर्ट कमिशनर म्हणून दावा मिळकत व दावा मिळकतीच्या लगतच्या सिटी सर्व्हे नंबर २०७८B/२, २०७७, २०७८A/१, २०७८A/२, २०७८A/३ व २०७८A/४ या मिळकतींची मोजणी करून हद्दी निश्चित करून नकाशा व रिपोर्ट दाखल करण्याचा आदेश केलेला आहे.

३. न्यायालयाचे आदेशाप्रमाणे मा. उपअधीक्षक भूमी अभिलेख, पुरंदर यांनी दावा मिळकतीची दिनांक १२.०९.२०२३ रोजी मोजणी केलेली असून सदर मोजणीचा नकाशा व अहवाल दिनांक १०.०५.२०२४ रोजी न्यायालयात दाखल केलेला आहे. मा. उपअधीक्षक भूमी अभिलेख, पुरंदर यांनी मो.र.नं. तातडी कोर्ट कमिशन ४/२०२३ मध्ये केलेल्या मोजणी प्रमाणे नकाशा तयार केला आहे. सदर मोजणी मध्ये सिटी सर्वे नंबर २०७८A/३, २०७८A/४ चे धारक म्हणजेच प्रतिवादी यांनी दावा मिळकत २०७८B/१ मध्ये १४.२५ चौ.मी चे अतिक्रमण केल्याचे निष्पन्न झाले आहे. सदर अतिक्रमण मो. र. नं. तातडी कोर्ट कमिशन ४/२०२३ मध्ये दर्शविलेले असून टिपा मध्ये स्पष्टपणे नमूद केले आहे. प्रतिवादी यांनी वादी यांचे दावा मिळकतीमध्ये केलेले अतिक्रमण काढून मिळण्यासाठी वादी यांनी प्रस्तुत दाव्यामध्ये खालील प्रमाणे दुरुस्ती करून अतिक्रमण क्षेत्राचा ताबा मिळणे आवश्यक झालेले आहे. असे कथन करुन वादी यांनी दाव्याचे सरनाम्यामध्ये दावा निरंतरचे ताकदीकरीता या पुढे अतिक्रमण क्षेत्राचा कब्जा मिळण्यासाठी, दावा कलम १ क प्रमाणे मिळकतीचे वर्णन समाविष्ट

करणेसाठी, दावा कलम ५ अ मध्ये कमीशन व अतिक्रमणाबाबतचा मजकूर समाविष्ट करणेसाठी, दावा कलम ६ मध्ये दाव्याच्या कारणामध्ये दुरुस्ती करण्यासाठी, दावा कलम ७ मध्ये दाव्याच्या आकारणी मध्ये दुरुस्ती करण्यासाठी व दावा कलम १० ड प्रमाणे अतिक्रमित क्षेत्राचा कब्जा प्रतिवादी यांचेकडून वादी यांना देण्यात यावा या मागणीचा समावेश करण्यासाठी प्रस्तुत अर्जान्वये विनंती केली आहे.

४. प्रतिवादी यांनी निशाणी क्र. ४१ येथे त्यांचे म्हणणे देवून असे कथन केले आहे की, वादी यांचा प्रस्तुतचा अर्ज हा साफ खोटा, लबाडीचा व बेकायदेशीर अशा स्वरूपाचा असून सदरचा अर्ज या प्रतिवादीस मुळीच मान्य व कबुल नाही. मुलतः याकामीची मा. उपअधिक्षक, भूमी अभिलेख पुरंदर यांचे मार्फतची दिनांक १२.०९.२०२३ रोजीची तथाकथीत स्वरूपाची मोजणी ही या प्रतिवादीस मुळीच मान्य व कबुल नाही. सदरचे मोजणीची कारवाई ही मोजणी करणे कामीच्या तरतुदीनुसार झालेली नाही. त्यामुळे त्याबाबतचे वादीचे प्रस्तुत अर्जातील कथन साफ खोटे व अतिरंजीत स्वरूपाचे असे आहे. वादी यांचा प्रस्तुत दावा व त्या मधील मागणी व याकामी अर्जात प्रस्तावीत दुरुस्तीची मागणी करून केलेली मागणी ही परस्पर विसंगत स्वरूपाची आहे. वादी वेगवेगळ्या कारणावरून नव–नवीन मागणी करून दिवाणी कायद्यातील तरतुदींचे विरुध्द मागणी करीत असल्याने अशा स्वरूपाची वादीची मागणी कायदयाने वादीस मागता येणार नाही.

५. दिवाणी प्रक्रिया संहितेच्या ऑर्डर ६ रूल १७ नुसार दाव्यातील प्रस्तावीत दुरुस्ती ही मुळ दाव्याचे गाभ्यात व स्वरूपात अमुलाग्र स्वरूपाचा बदल करणारी असल्याने ती कायद्यास व त्याकामीच्या तरतुदीस संमत नाही. मुळात वादीचे कथन की सदरची दुरुस्ती ही केवळ तांत्रीक स्वरूपाची अशी आहे हे साफ खोटे आहे. सदरची प्रस्तावीत दुरूस्ती मान्य झालेस दाव्याचे मुळ स्वरूपात व मागणीमध्ये अमुलाग्र स्वरूपाचा बदल होणार असल्याने प्रस्तुत अर्ज नामंजुर होणे न्यायाचे दृष्टीने अत्यंत आवश्यक झाले आहे. असे कथन करुन अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

६. वादी व प्रतिवादी तर्फे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. त्यांनी त्यांच्या अर्ज व

म्हणण्याप्रमाणे युक्तीवाद केला. सदर प्रकरणात वादी मोजणीच्या अनुषंगाने दाव्यामध्ये दुरुस्ती करुन मागत आहे. मी या ठिकाणी हे नमूद करतो की, वादीने दाव्याच्या कारणामध्ये प्रतिवादी यांनी बेकायदेशीरपणे व अनाधिकाराने वादी यांचे क्षेत्रामध्ये ताबा टाकून दि. ०१.०९.२०२२ रोजी लोखंडी खांब रोवून बांधकाम करण्याची धमकी दिली. या कारणास्तव दाखल केलेला आहे. तसेच दावा कलम १० अ प्रमाणे वादी यांचे मिळकतीमध्ये प्रतिवादी यांनी कोणत्याही प्रकारचे घराचे बांधकाम करु नये, दावा मिळकतीमधून डिसपझेस करु नये, हरकत अडथळा करु नये या निरंतर मागणीसाठी दाखल केलेला आहे. वादी यांना प्रस्तावित दुरुस्तीचे कारण हे दावा दाखल केल्यानंतर घडले आहे. वादीच्या मुळ दाव्यातील मागणीचा विचार करता वादी व प्रतिवादी यांच्यामधील वादग्रस्त असलेला खराखुरा प्रश्न निर्णित करण्यासाठी सदर प्रस्तावित दुरुस्ती आवश्यक आहे. सदर दुरुस्ती केल्यानंतर जादा कैफियत देण्याची संधी प्रतिवादीस असणार आहे. सदर दुरुस्तीस परवानगी दिल्यास वादी व प्रतिवादी यांच्यातील वाद याच दाव्यामध्ये निर्णित होणार आहे. वादीने त्याच्या अर्जाच्या कथनांच्या पुष्ठयर्थ प्रतिज्ञापत्र दिले आहे. सदरील अर्जामध्ये नमूद केलेल्या मजकूराबाबत दुरुस्ती करण्यास परवानगी देणे दाव्याच्या पुढील कार्यवाहीसाठी आवश्यक आहे. अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. सबब, वरील विवेचनाचा विचार करुन न्यायाचे उद्दिष्टय साध्य करण्यासाठी खालील आदेश पारीत करत आहेः–

**आदेश**

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. वादी यांनी पुढील तारखेपर्यंत प्रस्तावित दुरुस्ती करावी.

RAVINDRA ANANDRAO SAWANT
Digitally signed by RAVINDRA ANANDRAO SAWANT
Date: 2026.02.10 16:44:42 +0530

दिनांकः १०.०२.२०२६ **( रविंद्र आ. सावंत )**

सासवड. २ रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,

सासवड.

# CERTIFICATE

"I affirm that the contents of this P.D.F. file orders are same word for word as per original Judgment/order."

| | | |
|---|---|---|
| Name of Steno | : | P. R. Shirke (Stenographer Grade III) |
| Court Name | : | Shri. R. A. Sawant<br>C.J.J.D.& J.M.F.C.,Saswad. |
| Date | : | 10/02/2026 |
| Order signed by presiding officer on | : | 10/02/2026 |
| Order Uploaded on | : | 10/02/2026 |